# बृहन्मुंबई महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

**परिपत्रक**

क्र.एमओएम/४८ दि.११.०४.२०२५

विषय:- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या माहिती अर्जाचा/अपिल अर्जाचा मासिक अहवाल पाठविण्याबाबत.

संदर्भ:- १)परिपत्रक क्र.एमओएम/९७०६ दि.१२.०४.२००६
२) परिपत्रक क्र. एमओएम/९५३ दि.१६.०६.२००९
३)परिपत्रक क्र.एमओएम/११८८ दि.२१.१०.२०२१

केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कार्यालयात प्राप्त होणाऱ्या माहितीच्या अर्जावर आणि अपिल अर्जावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा दर महिन्याचा मासिक अहवाल पुढील महिन्याच्या ०५ तारखेपर्यंत सादर करण्याबाबतचे निर्देश उपरोक्त संदर्भ क्र.१ व २ च्या परिपत्रकानुसार देण्यात आलेले आहेत. तथापि, अजूनही बहुतांश कार्यालयांकडून मासिक अहवाल प्रत्येक महिन्याला पाठविला जात नाही. तसेच ब-याचशा कार्यालयांकडून अहवाल उशिराने प्राप्त होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या अर्ज/अपिल अर्जाचा अहवाल माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २५ (२)(३) च्या तरतुदींनुसार प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपूर्वी राज्य शासनास पाठविणे आवश्यक आहे. परंतु, उपरोक्त कारणांमुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे प्राप्त होणा-या/अपिल अर्जाचा एकत्रित अहवाल राज्य शासनास वेळेवर पाठविणे शक्य होत नाही.

यास्तव, सर्व खाते/विभाग प्रमुखांनी त्यांच्या अखत्यारितील सर्व उपविभागांचा माहिती अर्जाचा/अपिल अर्जाचा मासिक अहवाल प्राप्त करुन, आपल्या खाते/विभागाचा एकत्रित अहवाल सामान्य प्रशासन विभागास विहित वेळेत सादर करावा तसेच, राज्य माहिती आयोगाकडून कसूरदार जन माहिती अधिका-यांविरुध्द करण्यात आलेल्या दंडात्मक कार्यवाहीचा अहवाल विवरणपत्र- ५ मध्ये देताना राज्य माहिती आयोगाकडून प्राप्त झालेल्या आदेशाची स्वाक्षांकित केलेली छायांकित प्रत सुध्दा अहवालासोबत जोडून पाठवावी.

तरी सर्व खाते/विभाग प्रमुखांनी उपरोक्त निदेशांचे काटेकोरपणे पालन करावे.

| | | |
|---|---|---|
| सही/-१८/०३/२०२५ | सही/-२१/०३/२०२५ | सही/-०२/०४/२०२५ |
| (शारदा गोसावी) | (किशोर गांधी) | (डॉ. अश्विनी जोशी) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | सह आयुक्त (सा.प्र.) | अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) |

प्रकअ/१७०
२०२४-२५

सामान्य प्रशासन विभाग
क्र.एमओएम/४८ दि.११/०४/२०२५

प्रत - ------------------------------------------------------------------------

यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(श्रीम. लीना ता.शिंदे)
रचना व कार्यपध्दती अधिकारी (आयुक्त कार्यालय)

Scanned with ACE Scanner

जन - २०१

विवरणपत्र - 1

**जन माहिती अधिकाऱ्यांकडे प्राप्त झालेल्या अर्जावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती**

माहितीचा महिना:

| जन माहिती अधिका-यांचे नांव | मागील कालावधी मधील प्रलंबित अर्जांची संख्या | अहवालाच्या महिन्यात प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या | दारिद्र्य रेषेखालील व्यक्तिकडून प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या | एकूण अर्जांची संख्या (2 + 3) | त्यापैकी निकालात काढलेल्या अर्जांची संख्या (7+8) | माहिती दिलेल्या अर्जांची संख्या | माहिती नाकारण्यात आलेल्या अर्जांची संख्या | प्रलंबित अर्जांची संख्या (5-6) | अधिनियमातील कोणत्या कलमांन्वये माहिती नाकारली ते कलम | अहवालाच्या महिन्यात माहिती दिल्यामुळे जमा झालेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |

विवरणपत्र - 2

**जन माहिती अधिकाऱ्यांकडे प्राप्त झालेल्या अर्जावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती**

दिनांक: पर्यंत.

| जन माहिती अधिका-यांचे नांव | दि. 12.10.2005 पासुन प्राप्त झालेल्या एकूण अर्जांची संख्या | दि.12.10.2005 पासून दारिद्र्य रेषेखालील व्यक्तिकडून प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या | दि. 12.10.2005 पासुन निकालात काढलेल्या अर्जांची संख्या (5+6) | माहिती दिलेल्या अर्जांची संख्या | माहिती नाकारण्यात आलेल्या अर्जांची संख्या | प्रलंबित अर्जांची संख्या (2-3) | माहिती दिल्यामुळे दि. 12.10.2005 पासून जमा झालेली एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |



Scanned with ACE Scanner

अर्म २०८

## विवरणपत्र - 3

### अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्राप्त झालेल्या अपिलांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती

माहितीचा महिना:

| अपिलीय अधिकाऱ्यांचे नांव | मागील कालावधी मधील प्रलंबित अपिलांची संख्या | अहवालाच्या महिन्यात प्राप्त झालेल्या अपिलांची संख्या | एकूण अपिलांची संख्या (2+3) | त्यापैकी निकालात काढलेल्या अपिलांची संख्या (6+7) | अपिलकारांची विनंती मान्य केलेल्या अपिलांची संख्या | अपिलकारांची विनंती नाकारण्यात आलेल्या अपिलांची संख्या | प्रलंबित अपिलांची संख्या (4-5) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |

## विवरणपत्र - 4

### अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्राप्त झालेल्या अपिलांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती

दिनांक: पर्यंत.

| अपिलीय अधिकाऱ्यांचे नांव | दिनांक 12.10.2005 पासून प्राप्त झालेल्या अपिलांची संख्या | दिनांक 12.10.2005 पासून निकालात काढलेल्या अपिलांची संख्या (4+5) | अपिलकारांची विनंती मान्य केलेल्या अपिलांची संख्या | अपिलकारांची विनंती नाकारण्यात आलेल्या अपिलांची संख्या | प्रलंबित अपिलांची संख्या (2-3) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |

## विवरणपत्र - 5

### अपिलीय प्राधिकाऱ्यांकडून कसूरदार माहिती अधिकाऱ्यांविरुध्द करण्यात आलेल्या दंडात्मक कार्यवाहीची माहिती

माहितीचा महिना:

| दंडात्मक कारवाई करण्यात आलेल्या माहिती अधिकाऱ्यांची संख्या | कसूरदार माहिती अधिकाऱ्यांविरुध्द ठोठावण्यात आलेल्या दंडाची रक्कम | वसूल केलेल्या दंडाची रक्कम | वसूल करावयाच्या बाकी दंडाची रक्कम | दंडाव्यतिरिक्त शिस्तभंगाची कारवाई केली असल्यास अशा कारवाईचा तपशील | दि. 12.10.2005 पासून आतापर्यंत वसूल केलेली दंडाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

——०——